57

F:\TANPolic CF Advance

29 APR 2009

5

दि.२६.११.२००८ ते २९.११.२००८ या कालावधीत मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात जखमी झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना नुकसान भरपाई देण्यांबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्र. पीडब्ल्यूएफ-१००८/प्र.क्र.८/अ/ पोल-७

मंत्रालय, मुंबई. ३२. दि.२४ एप्रिल, २००९.

संदर्भ:-१) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७,दि. १६ मार्च, २००५

२) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७,दि. ६ जुलै, २००५

३) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००८/प्र.क्र.८/पोल-७,दि. २९ नोव्हेंबर, २००८

४) शासन निर्णय महसुल व वन विभाग क्रमांक : डिएमयू -२००८/प्र.क्र. ३९९/ डीएम-१, दि. १.१२.२००८.

५) पोलीस महासंचालक म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. पोमस/२८-अ/४९३७/नुकसान भरपाई/ ४७/२००८. दिनांक ०२/०२/२००९.

६) शासन ज्ञापन वित्त विभाग क्र. आकनि-११.०९/०२/अर्थसंकल्प-११ दि. १६/०४/२००९.

प्रस्तावना:- दिनांक २९.११.२००८ च्या शासन निर्णयानुसार संपूर्ण राज्यात अतिरेकी कारवाई, दरोडेखोरी संघटीत गुन्हेगारी विरोधी कारवाई व आपत्कालीन काळात मदत करतांना जखमी वा मृत झालेल्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्या कुटुंबियांना नुकसानभरपाई व इतर सोयी सुविधा देण्याकरिता आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. दि.२९.११.२००८ च्या शासन आदेशानुसार जखमी झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना नूकसान भरपाई देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- दिनांक २६.११.२००८ ते २९.११.२००८ या कालावधीत अतिरेक्यांनी मुंबईवर दहशतवादी हल्ला केला. सदर दहशतवादी हल्ल्यांमध्ये पोलीस दलातील २६ पोलीस अधिकारी/कर्मचारी जखमी झाले आहेत. दिनांक २९.११.२००८ च्या शासन आदेशानुसार सोबत जोडलेल्या प्रपत्रातील यादीत नमूद केलेल्या जखमी पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी रु.४८.१० लक्ष (रुपये अठ्ठेचाळीस लक्ष दहा हजार फक्त) इतक्या अतिरिक्त रक्कमेचे अनुदान सन २००९-१० या वर्षासाठी खाली नमूद केलेल्या नियंत्रक अधिकारी यांना मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नियंत्रण अधिकारी | लेखाशीर्ष |
|---|---|---|
| १)<br>२) | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (रु१०,६०,०००)<br>पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (रु.३७,५०,०००) | १)मुख्य लेखाशीर्ष "२०५५- पोलीस" अंतर्गत लेखाशीर्ष "(००) ११३-पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण (००) (०४) कर्तव्य बजावीत असता जखमी अथवा मृत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) योजनेतर ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)" |

२. यासाठी होणारा खर्च वर नमुद केलेल्या लेखाशिर्षाखाली प्रथमत: शासन ज्ञापन वित्त विभाग क्र.आकनि-११.०९/०२/अर्थसंकल्प-११, दि.१६/०४/२००९ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या आकस्मिकता निधी अग्रिमातून रु.४८,१०,०००/- (रुपये अठ्टेचाळीस लक्ष दहा हजार फक्त) इतका खर्च भागविण्यात यावा.

३. या सबंधीचे देयके कोषागारात सादर करतांना त्यावर लाल शाईने सदर खर्च आकस्मिकता निधीतून करण्यात आला आहे. अशी नोंद घेण्यात यावी व सदर प्रकरणी पूरक अनुदान प्राप्त झाल्यावर ती मागणी बी-१ मुख्य लेखाशीर्ष "२०५५- पोलीस" अंतर्गत लेखाशीर्ष "(००) ११३-पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण (००) (०४) कर्तव्य बजावीत असता जखमी अथवा मृत झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुबियांना सानुग्रह अनुदान (२०५५ ०२९३) योजनेतर ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखार्शार्षाखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावी. रु.४८,१०,०००/- (रुपये अठ्टेचाळीस लक्ष दहा हजार फक्त) इतका मंजूर केलेला अग्रिम हा जखमी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना नुकसान भरपाई देण्याकरिता आहे.

४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी वरील मंजुरीप्रमाणे आकस्मिकता निधी अग्रिम रकमेतून खर्च करण्यासाठी देयके सादर करण्यासंदर्भात पुढील सूचना काटेकोरपणे पाळण्याबाबत संबंधितांना कळवावे.

(एक) आकस्मिकता निधीतून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे रक्कम सुपूर्द करण्यासंबंधीच्या आदेशात आगाऊ रक्कमेतून खर्च करतांना सादर करण्यात येणाऱ्या देयकावर "आकस्मिकता निधी अग्रिम, शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक:.आकनि-११.०९/०२/अर्थसंकल्प-११, दि.१६/०४/२००९ संगणक सांकेतांक ८०००४५४८ अन्वये मंजूर" असे लाल शाईने लिहावे, अशी सूचना आदेशात अंतर्भूत करावी व ही सूचना लाल शाईने अधोरेखित करावी.

(दोन) आकस्मिकता निधी अग्रिम रकमेतून खर्च करण्यासाठी वेगळी देयके सादर करावीत.

(तीन) देयकावर जोडलेल्या संगणक चिट्ठीवर अर्थसंकल्प शीर्षाचा कोड नंबर लिहिण्यात यावा.

(चार) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.सीएनएफ-१०८६/३५३/अर्थसंकल्प-३, दिनांक २८ ऑगस्ट, १९८६ अन्वये आकस्मिकता निधीमधील आगाऊ रकमेबाबत दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे.

(पाच) आकस्मिकता निधी अग्रिमातून करावयाच्या खर्चासंबंधी देयके काढतांना संगणक संकेतांकाचा वापर करावा.

५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी वरील मंजुरीप्रमाणे आकस्मिकता निधी अग्रिम खर्च करतांना ज्या कारणासाठी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याच कारणासाठी पूर्णपणे खर्च करावी. ते याकरिता पूर्ण जबाबदार राहतील. तसेच सदरहू अग्रिमातून प्रत्यक्ष खर्च केल्याची माहिती त्यांनी शासनास दिनांक ३१.०५.२००९ पूर्वी अवगत करावी.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना विनंती करण्यात येते की, त्यांना मंजूर केलेला निधी संबंधित क्षेत्रिय प्राधिकाऱ्यांना योग्य त्या प्रमाणात वाटप करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व तसे शासनास अवगत करावे.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०७/०९/व्यय-७, दिनांक १६/०२/२००९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु. बा. तुंबारे )
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई (प्रत्येकी पाच जादा प्रतींसह)
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), नागपूर (प्रत्येकी पाच जादा प्रतींसह)
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (दोन जादा प्रतींसह)
सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-३२ (दोन जादा प्रतींसह)
अधिदान व लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-११/व्यय-७
का.क्र. बीयुडी-१/ निवड नस्ती (कार्यासन पोल-७) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई .

F:\TAN\tab07

**शासन निर्णय क्रमांक पी.डब्ल्यू.एफ.-१००८/प्र.क्र. ८/पोल -७, दिनांक:- २४ एप्रिल, २००९ सोबतचे पपत्र.**

(दिनांक २६/११/२००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात जखमी झालेले पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची यादी व त्यांना द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम.)

| अ.क्र | जखमी झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे नाव | पद | नियंत्रक अधिकारी | देय नुकसान भरपाई रक्कम(रूपये) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. सदानंद दाते | अपर पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई | २,९०,०००/- |
| २ | श्री राजवर्धन | पोलीस उप आयुक्त बृहन्मुंबई | ---"--- | २,७०,०००/- |
| ३ | श्री. दिपक नरसू ढोले | पोलीस निरीक्षक, बृहन्मुंबई | ---"--- | २,५०,०००/- |
| ४ | श्री. संजय एकनाथ गोविलकर | सहा पोलीस निरिक्षक, बृहन्मुंबई | ---"--- | २,५०,०००/- |
| ५ | श्री विजय तुकाराम पवार | सहा पोलीस निरिक्षक, बृहन्मुंबई | ---"--- | २,५०,०००/- |
| ६ | श्री. विजय भिकाजी शिंदे | सहा पोलीस निरिक्षक, बृहन्मुंबई | ---"--- | २,५०,०००/- |
| ७ | श्री. नितीन दिगंबर काकडे | पोलीस उप निरिक्षक, बृहन्मुंबई | ---"--- | २,१०,०००/- |
| ८ | श्री मोहन तातोबा शिंदे | पो. ह./३३८, बृहन्मुंबई | ---"--- | १,८०,०००/- |
| ९ | श्री. अरूणकुमार सर्जेराव माने | पो. ना./३२९०, बृहन्मुंबई | ---"--- | १,५०,०००/- |
| १० | श्री. अरूण दादा जाधव | पो.ना./१६४२ बृहन्मुंबई | ---"--- | १,५०,०००/- |
| ११ | श्री. निवृत्ती बाबुराव गव्हाणे | पो.ना./४१२४ बृहन्मुंबई | ---"--- | १,५०,०००/- |
| १२ | श्री. अशोक लक्ष्मण पवार | पो.ना./६१२२ बृहन्मुंबई | ---"--- | १,५०,०००/- |
| १३ | श्री. प्रविण पांडुरंग सावंत | पो.ना./२८३८८ बृहन्मुंबई | ---"--- | १,५०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | श्री मुरलीधर चिंदु झोले | पो.शि./९७०९८३ बृहन्मुंबई | ---"--- | १,५०,०००/- |
| १५ | श्री. बंडु बाळू मोरे | पो.शि./३१६३५ बृहन्मुंबई | ---"--- | १,५०,०००/- |
| १६ | श्री. सचिन दादासाहेब टिळेकर | आर.टी.पी.सी./०१-९ ०१ बृहन्मुंबई | ---"--- | १,५०,०००/- |
| १७ | श्री. शंकर भाऊसाहेब वंदे | पो.शि./९६०३२० बृहन्मुंबई | ---"--- | १,५०,०००/- |
| १८ | श्री. सौदागार निवृत्ती शिंदे | पो.शि./२३९६५ बृहन्मुंबई | ---"--- | १,५०,०००/- |
| १९ | श्री. अमित रघुनाथ खेतले | आर.टी.पी.सी./०५-०१८३ बृहन्मुंबई | ---"--- | १,५०,०००/- |
| २० | श्री. विनायक चिंताराम दंडगवान | पो.शि./३०८१८ बृहन्मुंबई | ---"--- | १,५०,०००/- |
| २१ | श्री.बी.आर. भोसले | सपोनि (रेल्वे मुंबई) | पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई | २,५०,०००/- |
| २२ | श्री. पी.एस. पाटील | सपोउपनि (रेल्वे मुंबई) | ---"--- | १,८०,०००/- |
| २३ | श्री. एस.अे. पदरकर | सपोउपनि (रेल्वे मुंबई) | ---"--- | १,८०,०००/- |
| २४ | श्री. अे.डी. काळे | पोशि/२५३५ (रेल्वे मुंबई) | ---"--- | १,५०,०००/- |
| २५ | श्री. राजु पांडुरंग माने | सपोशि/९५५ (रारापोबल गट १० सोलापूर) | ---"--- | १,५०,०००/- |
| २६ | श्री. विश्वनाथ मारूती गायकवाड | सपोशि/९५२ (रारापोबल गट १० सोलापूर) | ---"--- | १,५०,०००/- |
| | | | एकूण | ४८,१०,०००/ |

29 APR 2009

0 5 2 13

288 3 2

59727

दि.२६.११.२००८ ते २९.११.२००८ या कालावधीत मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात जखमी झालेल्या होम गार्डस् यांना नुकसान भरपाई देण्यांबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्र. पीडब्ल्यूएफ-१००८/ब/प्र.क्र.८ / पोल-७

मंत्रालय, मुंबई. ३२. दि. २४ एप्रिल, २००९.

**संदर्भः-** १) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७,दि. १६ मार्च, २००५

२) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७,दि. ६ जुलै, २००५

३) शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-१००८/प्र.क्र.८/पोल-७,दि. २९ नोव्हेंबर, २००८

४) शासन निर्णय महसुल व वन विभाग क्रमांक : डिएमयू -२००८/प्र.क्र. ३९९/ डीएम-१, दि. १.१२.२००८.

५) पोलीस महासंचालक म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. पोमस/२८-अे/४९३७/नुकसान भरपाई/ ४७/२००८. दिनांक ०२/०२/२००९.

६) शासन ज्ञापन वित्त विभाग क्र. आकनि-११.०९/०३/अर्थसंकल्प-११ दि. १६/०४/२००९.

**प्रस्तावना:-** दिनांक २९.११.२००८ च्या शासन निर्णयानुसार संपूर्ण राज्यात अतिरेकी कारवाई, दरोडेखोरी संघटीत गुन्हेगारी विरोधी कारवाई व आपत्कालीन काळात मदत करतांना जखमी वा मृत झालेल्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्या कुटुंबियांना नुकसानभरपाई व इतर सोयी सुविधा देण्याकरिता आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर हल्ल्यात जखमी झालेल्या होम गार्डस्ना नूकसान भरपाई देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Mt-m
29/4

**शासन निर्णय :-** दिनांक २६.११.२००८ रोजी अतिरेक्यांनी मुंबईवर दहशतवादी हल्ला केला. सदर दहशतवादी हल्ल्यांमध्ये २ होमगार्डस जखमी झाले आहेत. दिनांक २९.११.२००८ च्या शासन आदेशानुसार ज्याप्रमाणे जखमी झालेल्या पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येते त्याप्रमाणे सोबत जोडलेल्या प्रपत्रातील यादीत नमूद केलेल्या जखमी होमगार्ड्सना रु.२.९० लक्ष (रुपये दोन लक्ष नव्वद हजार फक्त) इतक्या अतिरिक्त रक्कमेचे अनुदान सन २००९-१० या वर्षासाठी खाली नमूद केलेल्या नियंत्रक अधिकारी यांना मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नियंत्रण अधिकारी | लेखाशीर्ष |
|---|---|---|
| १ | महासमादेशक, गृह रक्षक दल, मुंबई रु.(२.९० लाख) | लेखाशीर्ष-"२०७० इतर प्रशासकीय सेवा (००) १०७ होमगार्ड (००)(०१) होमगार्ड- दत्तमत (२०७००२८१)३२ अंशदान " |

२. यासाठी होणारा खर्च वर नमुद केलेल्या लेखाशीर्षाखाली प्रथमत: शासन ज्ञापन वित्त विभाग क्र.आकनि-११.०९/०३/अर्थसंकल्प-११ दिनांक १६/४/२००९ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या रु.२,९०,०००/- (रुपये दोन लक्ष नव्वद हजार फक्त) आकस्मिकता निधी अग्रिमातून भागविण्यात यावा.

३. या सबंधीचे देयके कोषागारात सादर करतांना त्यावर लाल शाईने सदर खर्च आकस्मिकता निधीतून करण्यात आला आहे. अशी नोंद घेण्यात यावी व सदर प्रकरणी पूरक अनुदान प्राप्त झाल्यावर ती लेखाशीर्ष-"२०७० इतर प्रशासकीय सेवा (००) १०७ होमगार्ड (००) (०१) होमगार्ड- दत्तमत (२०७००२८१) ३२ अंशदान" या लेखाशीर्षाखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावी. रु.२,९०,०००/- (रुपये दोन लक्ष नव्वद हजार फक्त) इतका मंजूर केलेला अग्रिम हा जखमी होमगार्डस् यांना नुकसान भरपाई देण्याकरिता आहे.

४. महासमादेशक, गृह रक्षक दल, मुंबई यांनी वरील मंजुरीप्रमाणे आकस्मिकता निधी अग्रिम रकमेतून खर्च करण्यासाठी देयके सादर करण्यासंदर्भात पुढील सूचना काटेकोरपणे पाळण्याबाबत संबंधितांना कळवावे.

(एक) आकस्मिकता निधीतून खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे रक्कम सुपूर्द करण्यासंबंधीच्या आदेशात आगाऊ रक्कमेतून खर्च करतांना सादर करण्यात येणाऱ्या देयकावर "आकस्मिकता निधी अग्रिम, शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक: .आकनि-११.०९/०३/अर्थसंकल्प-११ दिनांक १६/४/२००९ संगणक सांकेतांक ८०००४५५७ अन्वये मंजूर" असे लाल शाईने लिहावे, अशी सूचना आदेशात अंतर्भूत करावी व ही सूचना लाल शाईने अधोरेखित करावी.

(दोन) आकस्मिकता निधी अग्रिम रकमेतून खर्च करण्यासाठी वेगळी देयके सादर करावीत.

(तीन) देयकावर जोडलेल्या संगणक चिट्ठीवर अर्थसंकल्प शीर्षाचा कोड नंबर लिहिण्यात यावा.

(चार) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.सीएनएफ-१०८६/१५३/अर्थसंकल्प-३, दिनांक २८ ऑगस्ट, १९८६ अन्वये आकस्मिकता निधीमधील आगाऊ रकमेबाबत दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे.

(पाच) आकस्मिकता निधी अग्रिमातून करावयाच्या खर्चासंबंधी देयके काढतांना संगणक संकेतांकाचा वापर करावा.

५. महासमादेशक, गृह रक्षक दल, मुंबई यांनी वरील मंजुरीप्रमाणे आकस्मिकता निधी अग्रिम खर्च करतांना ज्या कारणासाठी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याच कारणासाठी पूर्णपणे खर्च करावी.

ते याकरिता पूर्ण जबाबदार राहतील. तसेच सदरहू अग्रिमातून प्रत्यक्ष खर्च केल्याची माहिती त्यांनी शासनास दिनांक ३१.०५.२००९ पूर्वी अवगत करावी.

महासमादेशक, गृह रक्षक दल, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, त्यांना मंजूर केलेला निधी संबंधित क्षेत्रिय प्राधिकाऱ्यांना योग्य त्या प्रमाणात वाटप करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व तसे शासनास अवगत करावे.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०७/०९/व्यय-७, दिनांक १६/०२/२००९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु. बा. तुंबारे )
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति, अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महासमादेशक, गृह रक्षक दल, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई (प्रत्येकी पाच जादा प्रतींसह)
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), नागपूर (प्रत्येकी पाच जादा प्रतींसह)
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (दोन जादा प्रतींसह)
सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-३२ (दोन जादा प्रतींसह)
अधिदान व लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१७/व्यय-७
का.क्र. विशा-८ व बीयुडी-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (कार्यासन पोल-७)

**शासन निर्णय क्रमांक पी.डब्ल्यू.एफ.-१००८/प्र.क्र. ८/पोल -७, दिनांक:- २४ एप्रिल, २००९ सोबतचे पपत्र.**

(दिनांक २६/११/२००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात जखमी झालेले होम गार्डस् यांची यादी व त्यांना द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम.)

| अ.क्र. | जखमी झालेल्या होम गार्डस्चे नाव | पद | देय नुकसान भरपाई रक्कम.(रूपये) |
|---|---|---|---|
| १ | श्री. विश्वेश्वर शिशुपाल पाचरणे | होम गार्डस् | १,४५,०००/- |
| २ | श्री. उत्तम विष्णू सासूरकर | होम गार्डस् | १,४५,०००/- |
| | | एकूण | २,९०,०००/- |

66

(११६) (301

<u>अतितात्काळ / फॅक्स</u>

क्रमांक :- पोमसं/२८-अे/४१३७/नुकसान भरपाई (समाजविघातक)/४७/०८. मुंबई, दि.२४/५/२००९

संदर्भ :- १) पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचे पत्र क्र. डी-१२/ नुकसान भरपाई/शहिद-जखमी-पोकमं /०९, दि. ८/४/२००९ व दि.२७/४/२००९. → प्र-1911C

२) महाराष्ट्र शासन,गृहविभाग शासन निर्णय, क्र.पीडब्ल्युएफ -१००३/ प्र.क्र.८/पोल-७, दि.१६/३/२००५ → पताका 'अ'

३) महाराष्ट्र शासन,गृहविभाग शासन निर्णय, पूरक पत्र क्र.पीडब्ल्युएफ - १००३/प्र.क्र.८/पोल-७, दि.६/७/२००५

विषय :- नक्षलवाद्यांनी केलेल्या गोळीबारात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचे कुटुंबियांना तसेच जखमी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना आर्थिक नुकसान भरपाई देणेबाबत.

****

दिनांक ६/४/२००९ रोजी धानोरा परिसरातील मुंगनेर जंगल परिसरात पेट्रोलिंग करीत असताना जंगलात दबा धरुन बसलेल्या नक्षलवाद्यांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात खालील नमुद ३ पोलीस कर्मचारी शहिद झाले. तसेच ६ पोलीस कर्मचारी जखमी झाले. त्यांना संदर्भाधिन शासन निर्णयामधील तरतुदीनुसार प्रत्येकाच्या नावासमोर दर्शविलेल्याप्रमाणे आर्थिक नुकसान भरपाई तसेच सानुग्रह अनुदान अशी एकुण रक्कम **रू.३९,३०,०००/-** (रू. एकोणचाळीस लाख तीस हजार फक्त) मंजूर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी/ कर्मचा-याचे नाव | नेमणूकीचे ठिकाण | आर्थिक नुकसान भरपाईची रककम शा.नि.दि.१६/३/०५ नुसार | सानुग्रह अनुदान शा.नि.दि.६/७/०५ नुसार | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | शहिद पोशि/२७८५ ज्ञानेश्वर भगवान सेप | पो. अ. गडचिरोली | रु.७,५०,०००/- | रु १,५०,०००/- | रु ९,००,०००/- |
| २ | शहिद पोशि/२७४७ गोपीचंद नारायण नैताम | पो. अ. गडचिरोली | रु. ७,५०,०००/- | रु १,५०,०००/- | रु ९,००,०००/- |
| ३ | शहिद पोशि/२७०१ कालीदास स्त्री वड्डे | पो. अ. गडचिरोली | रु.७,५०,०००/- | रु १,५०,०००/- | रु ९,००,०००/- |
| ४ | जखमी पोहवा/३३६ मुन्नासिंग रामलालसिंग ठाकूर | पो. अ. गडचिरोली | रु.२,३०,०००/- | - | रु.२,३०,०००/- |
| ५ | जखमी पोशि/७२७ रवि जमनादास गेडाम | पो. अ. गडचिरोली | रु.२,००,०००/- | - | रु.२,००,०००/- |
| ६ | जखमी पोशि/१११४ विशाल जयेंद्रनाथ उमरे | पो. अ. गडचिरोली | रू.२,००,०००/- | - | रू.२,००,०००/- |
| ७ | जखमी पोशि/२३०० जगदीश मारोती इंगळे | पो. अ. गडचिरोली | रु.२,००,०००/- | - | रु.२,००,०००/- |
| ८ | जखमी पोशि/१५१२ रामकृष्ण यशवंत कापगते | विशेष कृती दल नागपूर ओ.एन.ओ. नागपूर | रु.२,००,०००/- | - | रु.२,००,०००/- |
| ९ | जखमी पोशि/२५१० दिपक समशेरसिंग ठाकुर | विशेष कृती दल नागपूर ओ.एन.ओ. नागपूर | रु.२,००,०००/- | - | रु.२,००,०००/- |
| | | एकुण | रु ३४,८०,०००/- | रु ४,५०,०००/- | रू. ३९,३०,०००/- |

67

(303)

अपर पोलीस महासंचालक /पोलीस अधिक्षक यांनी सदर मंजूर रक्कम उपरोक्त शहीद पोलीस अधिकारी /कर्मचारी यांचे कुटूंबियांना तसेच जखमी पोलीस कर्मचा-यांना तात्काळ अदा करून अनुपालन अहवाल या कार्यालयास सत्वर सादर करावा.

( अमिताभ गुप्ता )
पोलीस उपमहानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, अं.एन.ओ. नागपूर.

पोलीस अधिक्षक, गडचिरोली.

प्रत,

विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर

रोखपाल, का.क्र.३२, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई

२/- रोखपाल यांनी उपरोक्त नुकसान भरपाईची एकुण रक्कम रू. ३५,३०,०००/- (रू. पस्तीस लाख तीस हजार फक्त) पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचेकडे आणि रु.४,००,०००/- (रु चार लाख फक्त) अपर पोलीस महासंचालक, अ.एन.ओ. नागपूर यांच्याकडे सानुग्रह अनुदान निधीतून काढून संबंधीत शहीद पोलीस अधिकारी /कर्मचा-यांचे कुटूंबियांना तसेच जखमी पोलीस अधिकारी /कर्मचा-यांना अदा करण्यासाठी तात्काळ धनाकर्षाद्वारे पाठवावी व तसे कार्यासन क्र.२८-अ यांना कळवावे.

Received by

अतितात्काळ / फॅक्स

68 (1669) 383

पोमसं/२८-अे/४९३७/नुकसान भरपाई (समाजविघातक)/४७/०८, मुंबई, दि.२४/६/२००९

संदर्भ :- १) पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचे फॅक्स पत्र क्र. डी-१२/
नुकसान भरपाई/जखमी-पोकर्म /०८, दि.२२/६/२००९. — पृ - ३८१/८
२) महाराष्ट्र शासन,गृहविभाग शासन निर्णय, क्र.पीडब्ल्युएफ -१००३/
प्र.क्र.८/पोल-७, दि.१६/३/२००५ — ५ ताका - ३८

विषय :- नक्षलवाद्यांनी केलेल्या गोळीबारात जखमी झालेल्या पोलीस कर्मचारी यांना नुकसान भरपाई देणेबाबत.

****

दिनांक २०/६/२००९ रोजी १५.४५ वा. विअप गडचिरोली, विशेष कृती दल नागपूर तसेच पोमके गेरापत्ती येथील पोलीस पार्टी नक्षलविरोधी अभियान राबवित असताना ॲम्बुशमध्ये बसलेल्या नक्षलवाद्यांनी केलेल्या गोळीबारात खालील नमुद ४ पोलीस कर्मचारी जखमी झाले. त्यांना संदर्भाधिन शासन निर्णयामधील तरतुदीनुसार प्रत्येकाच्या नावासमोर दर्शविलेल्याप्रमाणे नुकसान भरपाईची एकूण रक्कम रू.८,००,०००/- (रू. आठ लाख फक्त) मंजूर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | जखमी पोलीस कर्मचा-याचे नाव | नेमणूकीचे ठिकाण | शा.नि.दि.१६/३/०५ नुसार द्यावयाची नुकसान भरपाईची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | पोशि/२७७२ हेमेंद्र नैताम | विशेष कृती दल नागपूर | रु.२,००,०००/- |
| २ | पोशि/३८८ सचिन डोंगरे | विशेष कृती दल नागपूर | रू.२,००,०००/- |
| ३ | पोशि/१९७२ अरुण टेकाम | वि.अ.प. गडचिरोली | रु.२,००,०००/- |
| ४ | पोशि/३०६ विजय बावनथडे | विशेष कृती दल नागपूर | रु.२,००,०००/- |
| | | एकुण | रु ८,००,०००/- |

पोलीस अधिक्षक यांनी सदर मंजूर रक्कम उपरोक्त जखमी पोलीस कर्मचा-यांना तात्काळ अदा करून अनुपालन अहवाल या कार्यालयास सत्वर सादर करावा.

वउस (नि/वि)
Ka 25/6/09

( डॉ. के. वेंकटेशम ) 25/6/9
पोलीस उपमहानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

पोलीस अधिक्षक, गडचिरोली.

Recd.

(3) 26/6/09

3014 25/6/09

69

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, न.वि.अ. नागपूर

विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर

रोखपाल, का.क्र.३२, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई

२/- रोखपाल यांनी उपरोक्त नुकसान भरपाईची एकूण रक्कम रू. ८,००,०००/- (रू. आठ लाख फक्त) पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचेकडे सानुग्रह अनुदान निधीतून काढून संबंधीत जखमी पोलीस कर्मचा-यांना अदा करण्यासाठी तात्काळ धनाकर्षाद्वारे पाठवावी व तसे कार्यासन क्र.२८-अे यांना कळवावे.

दि.०५.१०.२०१० रोजी अहेरी तालुक्यात नक्षलवादी हल्ल्यात जखमी झालेल्या आठ पोलीस कर्मचा-यांना प्रत्येकी रु.२.०० लाख सानुग्रह अनुदान देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक:- पीडब्ल्यूएफ १०१०/प्र.क्र.५११/पोल-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- ०१ नोव्हेंबर, २०१०

वाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८ /पोल-७, दिनांक १६ मार्च, २००५

२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.पोमंस २८-अे/ नु.भ.-शहिद/१२७/२०१०, दि.१९.१०.२०१० चे पत्र.

३) पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचे क्र. डी-१२/जखमी/अनुदान/दलाई/२०१०, दि. ०६.१०.२०१०

<u>प्रस्तावना :-</u> नक्षलविरोधी कारवाईत/नक्षलवादी हल्ल्यात जखमी झालेल्या पोलीस अधिकारी यांच्या कुटुंबियांना संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये रु.२.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. तद्नूषंगाने दि.०५.१०.२०१० रोजी गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यात नक्षलवाद्यानी घडविलेल्या भू-सुरुंग स्फोटात जखमी झालेल्या आठ पोलीस कर्मचा-यांना शासन निर्णयातील तरतूदीन्वये प्रत्येकी रु.२.०० लाख सानुग्रह अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u> दि.०५.१०.२०१० रोजी गडचिरोली जिल्हयातील अहेरी तालुक्यात नक्षलवाद्यानी घडविलेल्या भू-सुरुंग स्फोटात आठ पोलीस कर्मचारी जखमी झालेले आहेत. सदर जखमी झालेल्या पोलीस कर्मचा-यांना प्रत्येकी रु.२.०० लक्ष याप्रमाणे एकूण रु.१६.०० लक्ष इतक्या रकमेचे सानुग्रह अनुदान प्रस्तुत शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येत आहे. जखमी पोलीस कर्मचा-यांची नावे व त्यांना अदा करावयाची रक्कम याबाबतचा तपशिल सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये दर्शविण्यात आला आहे.

याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावित असतांना जखमी झालेल्य पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानूग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१०-११ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४०८/१०/व्यय-७ दि.८.१०.२०१० अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(भि.ग.वांढवे)
सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक, महराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली.
पोलीस अधिक्षक, गडचिरोली
महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सह सचिव अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुबई-३२.
जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.
बीयुडी-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती (पोल-७).

शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पीडब्ल्यूएफ १०१०/प्र.क्र.५९१ /पोल-७,
दिनांक:- १ नोव्हेंबर, २०१० सोबतचे प्रपत्र "अ"

( दि.५.१०.२०१० रोजी गडचिरोली जिल्ह्यात अहेरी तालुक्यात नक्षलवादी हल्ल्यात जखमी झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना अदा करावयाच्या सानुग्रह अनुदानाचा तपशिल )

प्रपत्र - "अ"

| अ.क्र. | नाव | पद | मंजूर रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | श्री.इम्रान मेहबूब शेख | पोशि/१९२ | २.०० लक्ष |
| २ | श्री.गणपत पोट्टी सायाम | पोशि/२७५८ | २.०० लक्ष |
| ३ | श्री.उध्दव पंढरी कुमरे | पोशि/१४२१ | २.०० लक्ष |
| ४ | श्री.सुरेश अंकलु अलोणे | पोशि/२४१० | २.०० लक्ष |
| ५ | श्री.सागर सन्मुखराव मारगोनीवार | पोशि/२६५ | २.०० लक्ष |
| ६ | श्री.उमेश दुग्गा कोरामी | पोशि/३२५३ | २.०० लक्ष |
| ७ | श्री.सुरेश रोहणकर | नापोशि/२१९२ | २.०० लक्ष |
| ८ | श्री.रमेश दलाई | नापोशि/२०१४ | २.०० लक्ष |
| | | एकुण | रु.१६.०० लक्ष |

73

दि. ३.८.२०१० रोजी बॉम्ब सदृष्य वस्तु निष्कासित करत असतांना सदर वस्तुचा स्फोट होऊन संदर स्फोटात कायमचे अपंगत्व आलेले पोलीस हवालदार किशोर कावळे यांना नुकसान भरपाई देण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन
### गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक:- पीडब्ल्यूएफ ०४११/प्र.क्र.१६४-अ /पोल-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- ९ जून, २०११

वाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७, दिनांक १६ मार्च, २००५

<u>शासन निर्णय :-</u> गडचिरोली जिल्ह्यात नक्षलविरोधी अभियानाअंतर्गत मिळून आलेले ३ लोखंडी डब्बे संशयीत वस्तु म्हणून दि. ३.८.२०१० रोजी तपासणी व निष्कासित करण्याची कार्यवाही करत असतांना त्यांचा अचानक स्फोट होऊन सदर स्फोटात पोहवा/१३३५ किशोर कावळे यांना गंभीर दुखापत होऊन त्यांना कायमचे अपंगत्व आलेले आहे. त्यामुळे त्यांना शासन निर्णयातील तरतूदीनुसार रु.३.०० लक्ष नुकसान भरपाई देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. याबाबत येणारा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावित असतांना जखमी झालेल्य पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानूग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून तो सन २०११-१ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या खर्चासाठी पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांना नियंत्रक,आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३०८/११/व्यय-७ दि.६.४.२०११ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.शा.घाटगे)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक, महराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस अधिक्षक, गडचिरोली
महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सह सचिव अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.
बीयुडी-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती (पोल-७).

दि.२६.११.२००८ ते २९/११/२००८ या कालावधीत मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात जखमी झालेल्या दोन पोलीस कर्मचा-यांना प्रत्येकी रु.२.०० लाख सानुग्रह अनुदान देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- पीडब्ल्यूएफ १२०९/प्र.क्र.७९९ /पोल-७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- ३ ऑगस्ट, २०११**

वाचा :-

१) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-१००८/प्र.क्र.८ /पोल-७,दिनांक २९ नोव्हेंबर, २००८

२) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक-पीडब्ल्यूएफ-१००३/प्र.क्र.८ /पोल-७, दिनांक १६ मार्च, २००५

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.पोमंसर२८-अ/स.नि./१३४/२००८, दि.१७.११.२००९ चे पत्र.

४) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे क्र. १५९८/पोआ/कक्ष-१३/पोकनि/२००९, दि. २५.०६.२००९

**प्रस्तावना :-** दि.२९/११/२००८ च्या शासन निर्णयानुसार संपुर्ण राज्यात अतिरेकी कारवाई, दरोडेखोरी, संघटीत गुन्हेगारी विरोधी कारवाई व आपत्कालीन काळात मदत करतांना जखमी वा मृत झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई व इतर सोयी सुविधा देण्याकरीता आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तद्नूषंगाने दि.२६.११.२००८ ते २९/११/२००८ या कालावधीत मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात जखमी झालेल्या दोन पोलीस कर्मचा-यांना प्रत्येकी रु.२.०० लाख सानुग्रह अनुदान देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** दि.२६.११.२००८ ते २९/११/२००८ या कालावधीत मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात जखमी झालेले सर्वश्री समाधान शंकर मोरे व शंकर शामराव पवार या दोन पोलीस कर्मचा-यांना प्रत्येकी रु.२.०० लाख प्रमाणे एकुण रु.४.०० लाख (अक्षरी रु.चार लाख फक्त)सानुग्रह अनुदान अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

याबाबतचा खर्च "२०५५-पोलीस, (००) ११३, पोलीस कर्मचारी वर्ग यांचे कल्याण-(००) (०४) कर्तव्य बजावित असतांना जखमी झालेल्य पोलीसांना व मृत पावलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या कुटुंबियांना सानूग्रह अनुदान (२०५५ ०२९३) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली सन २०११-१२ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

२. श्री.समाधान शंकर मोरे (सपोशि/६२०) यांना रु.२.०० लक्ष इतकी रक्कम अदा करण्याकरीता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना त्याचप्रमाणे श्री.शंकर शामराव पवार (पोशि/९६००९२) यांना रु.२.०० लक्ष इतकी रक्कम अदा करण्याकरीता पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४३७/११/व्यय-७, दि.१८.७.२०११ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.शा.घाटगे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
सह सचिव अर्थसंकल्प,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०),मंत्रालय मुंबई-३२.
बीयुडी-१ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती (पोल-७).